पेजिनेशनसाठी
अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काजळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १८७। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | मंगळवार ०४/०८/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेंद्रमध्ये बांधा !
मेन रोड, संगमनेर, फोन : ०२४२५ - २२५७४०, ७९०१०३११५५
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र

# मोठा पर्दाफाश !

# 'चिल्ड्रन बँक'च्या बनावट नोटांची फसवणूक करणारी टोळी जेरबंद



## १२.४० लाखांचा मुद्देमाल जप्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - खऱ्या नोटांच्या बदल्यात चौपट बनावट नोटा देण्याचे आमिष दाखवून नागरिकांची लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा संगमनेर शहर पोलिसांनी थरारक कारवाईत पर्दाफाश केला आहे. नागरिकांच्या सतर्कतेमुळे ही टोळी पोलिसांच्या जाळ्यात अडकली. रविवारी (दि.) सकाळी सुमारे १०.३० वाजता जनता नगर परिसरात ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी चार आरोपींना अटक करत तब्बल १२ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

आरोपी नागरिकांना दोन लाख रुपयांच्या खऱ्या नोटांच्या बदल्यात आठ लाख रुपयांच्या नोटा देण्याचे आमिष दाखवत होते. मात्र प्रत्यक्षात नोटांच्या बंडलमध्ये वर आणि खाली खऱ्या नोटा ठेवून मध्ये **'Children Bank of India'** असे छापलेल्या खेळण्यातील बनावट नोटा भरल्या जात होत्या. वरवर पाहता बंडल पूर्णपणे खऱ्या नोटांचे वाटत असल्याने अनेकजण या फसवणुकीला बळी पडत होते.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सागर नागरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मयुर किशोर सिद्धपुरा (वय ३८, रा. खामगाव), उमेश कांबळे (रा. खामगाव), संदीप धडमवार (रा. नाशिक) आणि गोलू उर्फ शंकर गिरी (रा. शेगाव) या चौघांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रोख रक्कम - १ लाख ८५ हजार रुपये, दर्शनी मूल्य १४ लाख रुपये असलेल्या 'Children Bank of India'च्या खेळण्यातील बनावट नोटांचे बंडल, १० लाख रुपये किमतीची टाटा नेक्सॉन कार (चक ५६ - ४४२३), तीन मोबाईल फोन व इतर साहित्य (पान ५)

### वादातून उघड झाला फसवणुकीचा कट

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एमएच ५६ ए ४४२३ क्रमांकाची टाटा नेक्सॉन कार संगमनेर शहरात आली होती. नाशिक–पुणे महामार्गावरील बाजार समितीजवळ या कारने दुसऱ्या वाहनाला कट मारल्याने दोन्ही वाहनचालकांमध्ये जोरदार वाद झाला. प्रकरण हातघाईवर जाण्याची चिन्हे दिसताच कारचालकाने भरधाव वेगाने कार पळवत इंदिरानगरमार्गे जनता नगर गाठले. या दरम्यान आणखी एका दुचाकीस्वारालाही कट मारण्यात आला. संतप्त झालेल्या दुचाकीस्वाराने कारचा पाठलाग केला.

जनता नगर परिसरात कार थांबताच चालकासह तीघेजण कार सोडून पळाले व परिसरात लपून बसले. घटनेची माहिती मिळताच संगमनेर शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. उभ्या असलेल्या कारमध्ये अनेक बॅगा भरलेल्या अढळून आल्या तसेच नोटाच्या बंडलासाठी लागणारे रबराचे पाकिट अढळून आल्याने नागरीकांना संशय वाढला. त्यामुळे फरार झालेल्या चौघांचा शोध सुरू झाला. जनता नगर येथील उद्यानात लपलेल्या एका संशयिताला नागरिकांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. तर तिघे जण फरार झाले. त्यानंतर चौकशीदरम्यान संपूर्ण फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला.

# भाजप अध्यक्षांच्या गडातच पक्षाला घरघर

## प्रशांत किशोर आघाडीवर



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

बिहार, मध्य प्रदेश आणि गुजरातमधील तीन विधानसभा जागांवर ३० जुलै रोजी झालेल्या पोटनिवडणुकांची मतमोजणी सुरू आहे. बिहारमधील बांकीपूरमध्ये, जन सुराजचे संस्थापक प्रशांत किशोर सुरुवातीच्या कलांमध्ये आघाडीवर आहेत. त्यामुळे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्या गडाला आणि पर्यायाने भाजपला मोठा धक्का बसला आहे. मध्य प्रदेशातील दतिया मध्ये देखील भाजप आणि काँग्रेस मध्ये काट्याची टक्कर असून कधी भाजप पुढे तर कधी काँग्रेस पुढे जात असून यामुळे या जगोकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आणि गुजरातमधील मंजलपूरमध्ये पहिल्या फेरीच्या मतमोजणीनंतर भाजपचे उमेदवार आघाडीवर आहेत.

बांकीपूरची जागा भाजप अध्यक्ष नितीन नवीन यांची पारंपरिक जागा मानली जाते. ते राज्यसभेवर गेल्यानंतर येथे पोटनिवडणूक होत आहे. दुपार पर्यंत हाती आलेल्या कलामध्ये प्रशांत किशोर यांना २१९४१ मते मिळाली आहेत. भाजपचे नीरज कुमार यांना १५५२२ मते मिळाली आहेत आणि ते ८६२ मतांनी मागे आहेत. दतियामध्ये भाजपचे आशुतोष तिवारी यांना २४०७० मते, काँग्रेसचे घनश्याम सिंह यांना २५८५६ मते आणि आझाद समाज पार्टीला २११७ मते मिळाली. काँग्रेस १८०० मतांनी आघाडीवर आहे. गुजरातमधील मंजलपूरमध्ये भाजपचे सतीश पटेल आघाडीवर आहेत. या पोट निवडणूकीत तीन पैकी भाजपला १ जागा मिळण्याची शक्यता आहे.

# रेल्वेसाठी शेवटपर्यंत लढणार - आ. खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - नाशिक-पुणे रेल्वेमार्ग हा संगमनेर मार्गेच व्हावा, हीच आमची ठाम भूमिका असून त्यासाठी आवश्यक तो संघर्ष आणि पाठपुरावा सातत्याने सुरू आहे. हा संघर्ष केवळ कॅमेऱ्यासमोर किंवा लोकांना दाखवण्यासाठी नसून निर्णय घेणाऱ्या यंत्रणेशी सातत्याने संवाद साधूनच तो पुढे नेला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही नाशिक-पुणे रेल्वेमार्गाबाबत सकारात्मक शब्द दिला असल्याने नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन आमदार अमोल खताळ यांनी केले.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात आमदार खताळ यांनी सांगितले की, नाशिक-पुणे रेल्वेमार्गाबाबत नागरिकांच्या मनात अनेक प्रश्न आहेत. या प्रकल्पासाठी संगमनेर तालुक्यात भूसंपादनाची प्रक्रियाही पूर्ण झाली होती. मात्र, मध्यंतरी केंद्रीय रेल्वेमंत्र्यांनी हा प्रकल्प रद्द झाल्याचे जाहीर केले होते.

# प्राथमिक शिक्षक बँकेच्या सभेत गोंधळ

## 'शेड्यूल्ड'चा विषय स्थगित, विरोधकांचा वॉकआऊट कुटुंब आधार निधी २१ लाखांवर; व्याजदर ७ टक्के



युवावार्ता (प्रतिनधी)

संगमनेर - संगमनेर प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेच्या १०७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत रविवारी (दि. २) सुरुवातीला मोठा गोंधळ निर्माण झाला. 'शेड्यूल्ड' दर्जाच्या विषयावर सभासदांकडून जोरदार चर्चा, घोषणाबाजी आणि आक्षेप नोंदविण्यात आल्याने काही काळ सभेचे वातावरण तापले होते. अखेर हा वादग्रस्त विषय स्थगित ठेवून त्यावर स्वतंत्र विशेष सभा घेण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. त्यानंतर उर्वरित सर्व विषयांना सभेने मंजुरी दिली. मात्र, सभेच्या उत्तरार्धात विरोधी गटाने वॉकआऊट करत सभेवर बहिष्कार टाकला.

सभेच्या अध्यक्षस्थानी सरस्वती घुले होत्या. यावेळी संचालक शिवाजी कराड, गोरक्षनाथ विटनोर, ज्ञानेश्वर शिरसाठ, बाळासाहेब तापकिर, योगेश वाघमारे, बाळू सरोदे, रमेश गोरे, रामेश्वर चोपडे, निर्गुणा बांगर, संदीप मोटे, कैलास लवांडे, अण्णासाहेब आभाळे, सारोक्ते, भाऊराव राहिंज, महेश भणभणे, सूर्यकांत काळे, शशिकांत जेजूरकर, संतोषकुमार राऊत, कल्याण माणिक कदम, कारभारी बाबर, मुख्य कार्यकारी अधिकारी जगताप तसेच अधिकारी गणेश पाटील व जयसिंग म्हस्के उपस्थित होते.

संचालक कल्याण लवांडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. श्रद्धांजली ठरावाचे वाचन उपाध्यक्ष शिवाजी कराड यांनी केले. सभेतील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला तो 'शेड्यूल्ड' दर्जाचा. (पान ३ वर)

### सभेतील महत्त्वाचे निर्णय

**कुटुंब आधार निधी २१ लाख रुपये करण्यात आला.**
**शैक्षणिक, वाहन व गृहकर्जावरील व्याजदर ७ टक्के**
**जामीन कर्जाच्या व्याजदरात ०.१५ टक्क्यांची कपात.**
**आचार्य दोंदे पुरस्काराची रक्कम दुप्पट करण्याचा निर्णय.**
**कर्ज मर्यादेत ५ लाख रुपयांची वाढ.**
**७५० रुपयांची कपात रद्द करण्यास मंजुरी.**

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि
व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या
एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# 'भाऊ-एक प्रेरणा गाथा' पुस्तकाचे प्रकाशन

## अभिनव परिवारातील कर्मचाऱ्यांकडून मधुभाऊंच्या कार्याविषयी भावना शब्दबद्ध




युवावावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव नवले यांच्या प्रेरणादायी जीवनकार्यावर आधारित 'भाऊ-एक प्रेरणा गाथा' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा अभिनव शिक्षण संस्थेच्या प्रांगणात उत्साहात पार पडला. अभिनव परिवारातील सर्व कर्मचाऱ्यांनी या पुस्तकामध्ये भाऊंविषयी असलेल्या आपल्या भावना, आठवणी आणि कृतज्ञता शब्दबद्ध केल्या आहेत.

या प्रकाशन सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, आमदार डॉ. किरण लहामटे, शेतकरी नेते दशरथ सावंत, एस. झेड. देशमुख, ज्येष्ठ पत्रकार शांताराम गजे, थोरात साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन पांडुरंग घुले, प्राचार्य डॉ. जयश्री देशमुख, संस्थेचे सचिव विक्रम नवले आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते 'भाऊ-एक प्रेरणा गाथा' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी प्राचार्या अल्फोन्सा डी., पत्रकार हेमंत आवारी, शिवाजी नेहे, प्रा. विलास नवले, सतीश पाचपुते, एस. टी. येलमामे, प्राचार्य बी. वाय. देशमुख, उदय माळवे, डॉ. सुनील वैद्य, अनिल वाकचौरे, सतीश वाकचौरे यांच्यासह सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर तसेच अभिनव परिवारातील सर्व कर्मचारी, बुवासाहेब नवले पतसंस्था व मल्टीस्टेटचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संगीत शिक्षक इंद्रभान कोल्हाळ यांनी माणसा मी तुझे गीत गावे, ज्यात तुझे हित व्हावेहे गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. सत्कारमूर्ती मधुकरराव नवले यांनी आपल्या भाषणातून आजपर्यंतच्या जीवनप्रवासातील संघर्ष, अनुभव आणि संस्थेच्या उभारणीतील महत्त्वपूर्ण प्रसंगांना उजाळा दिला. तसेच अभिनव परिवारातील सर्व कर्मचाऱ्यांनी पुस्तक निर्मितीसाठी घेतलेल्या परिश्रमांचे कौतुक केले.

**भाऊंचे कार्य दिशादर्शक व समाज परिवर्तन करणारे : डॉ. सुधीर तांबे**

**यावेळी मनोगत व्यक्त करताना माजी आमदार डॉ. सुधीर तांबे म्हणाले, भाऊंचे कार्य हे दिशादर्शक, प्रेरणादायी आणि समाज परिवर्तन करणारे आहे. त्यांनी आयुष्यभर संघर्षातून उद्दिष्टपूर्तीकडे वाटचाल केली असून शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे.**

**अकोलेच्या शैक्षणिक विकासातील महत्त्वाचा टप्पा : आ. डॉ. लहामटे**

**आ. डॉ. किरण लहामटे म्हणाले, मधुकरराव नवले यांनी उभी केलेली संस्था आणि इंग्रजी शिक्षणाची उपलब्ध करून दिलेली सुविधा ही अकोले तालुक्याच्या शैक्षणिक विकासातील महत्त्वाचा मैलाचा दगड ठरली आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी मिळाली. पुस्तकाच्या संपादक प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख यांनी प्रास्ताविकात सांगितले की, अभिनव शिक्षण संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांनी भाऊंविषयी असलेल्या भावना या पुस्तकाच्या माध्यमातून व्यक्त केल्या आहेत. हे पुस्तक म्हणजे अभिनव परिवारातील प्रत्येक घटकाच्या मनातील भाऊंवरील श्रद्धा, प्रेम आणि विश्वासाचे शब्दरूप दस्तऐवजीकरण आहे. या प्रकाशन सोहळ्यामुळे मधुकरराव नवले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव झाला असून अभिनव परिवारातील एकात्मता आणि कृतज्ञतेची भावना अधोरेखित झाली.**

# गांजा विक्रेत्यांवर छापा

## सव्वा दोन लाखांचा मुद्देमाल जप्त, तीन जणांवर गुन्हा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- अंमली पदार्थ विक्रीविरोधात अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सचे नोडल अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाची स्थापना करण्यात आली. या पथकाने संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत कारवाई करीत गांजा या अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून ज्युपिटर मोपेड, मोबाईल व गांजा असा सुमारे २ लाख ३४ हजार २५० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या कारवाईत पथकातील पोलीस अंमलदार गणेश लोंढे, निळकंठ कारखेले, सोमनाथ झांबरे व शिवप्रसाद काकडे तसेच पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या आदेशान्वये संगमनेर शहर पोलीस ठाण्यातील सहायक पोलीस निरिक्षक सचिन वाकडे, पोलीस उप निरीक्षक इम्रान खान, श्रीकांत सावंत व पोलीस अंमलदार आत्माराम पवार, बाबासाहेब सातपुते, राहुल पांडे व संदीप कोंदे यांनी सहभाग घेतला. गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या ठिकाणी संजय उर्फ संदीप राजू मालुंजकर, रा. जनतानगर, नम्रता किराणा दुकानासमोर, संगमनेर येथे साथीदारांसह त्याच्या राहत्या घरामध्ये गांजाच्या पुड्या तयार करून विक्री करत असल्याची माहिती मिळाली होती. पथकाने गोपनीय माहितीतील ठिकाणी छापा टाकला असता, तेथे संजय उर्फ संदीप राजू मालुंजकर, वय २६, रा. जनतानगर, नम्रता किराणा दुकानासमोर, संगमनेर, आकाश विजय क्षीरसागर, वय २९, हल्ली रा. लक्ष्मीनगर, संगमनेर व प्रविण सखाराम पाचकर, वय २८, हल्ली रा. जनतानगर, संगमनेर यांना ताब्यात घेतले. घराची व घरासमोरील ज्युपीटर मोटार सायकलची झडती घेतली असता घरात व मोटार सायकलच्या डिक्कीमध्ये अंमली पदार्थ गांजा मिळून आला. आरोपींच्या ताब्यातून १ लाख ३ हजार २५० रुपये किंमतीचा ४ किलो १३० ग्रॅम वजनाचा गांजा, ८० हजार रुपये किमतीची ज्युपिटर दुचाकी (एमएच. १७डीके. ५१२९), ५० हजार रुपयांचा मोबाईल, प्लास्टीकच्या छोटया पिशव्या, चिकट टेप, स्टेप्लर व पिना असा एकूण २ लाख ३४ हजार २५० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ताब्यात घेतलेल्या आरोपी विरुध्द संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पाकिस्तानी उत्पादनांवर FDA चा छापा

## संगमनेरातील दोन दुकानांवर कारवाई




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पाकिस्तानमध्ये तयार होणारी मानवी आरोग्यास घातक मानली जाणारी 'गोरी ब्यूटी क्रीम' आणि 'गोरी डे अँड नाईट क्रीम'ची संगमनेरच्या बाजारात विक्री करणाऱ्या दोन दुकानांवर अन्न व औषध प्रशासनाने छापे टाकून १२ हजार ९०० रुपयांचा पाकिस्तानात उत्पादित झालेला सौंदर्यप्रसाधनांचा साठा जप्त केला.

दुकानदाराला चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. पाकिस्तानात तयार होणाऱ्या गोरी ब्यूटी क्रीम आणि गोरी डे अँड नाईट क्रीमची संगमनेरमध्ये विक्री केली जात होती. याची माहिती अन्न व औषध प्रशासनाला मिळाली होती.प्रशासनाच्या पथकाने संगमनेर शहर पोलिसांच्या मदतीने शनिवारी (दि. १) दुपारी गोल्डन मार्केटमधील दुकानावर छापा टाकत १२ हजार ९०० रुपयांचा पाकिस्तानी सौंदर्यप्रसाधनांचा साठा जप्त केला.

याप्रकरणी संबंधित दुकानदाराला चौकशीसाठी ताब्यात घेतले असून त्याच्याविरुद्ध संगमनेर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.याबाबत अन्न व औषध निरीक्षक सोमनाथ मुळे (अहिल्यानगर) यांच्या फिर्यादीनुसार शाहीद रियाज शेख (वय ३६, रा. शिकलकर लेन, मोगलपुरा, पुणे रोड व दुसरे दुकान रहेमतनगर जोर्वे रोड) संगमनेर याच्या दोन्ही दुकानांवर छापे टाकण्यात आले. तपासणीदरम्यान पाकिस्तान इन पाकिस्तान स्टँडर्ड, असा उल्लेख असलेल्या गोरी ब्यूटी क्रीम व गोरी डे अँड नाईट क्रीमचा साठा आढळून आला. यामध्ये विविध किमतीचे बॉक्स जप्त करण्यात आले. या सौंदर्यप्रसाधनातील काही घटक त्वचा, किडनी तसेच मानवी आरोग्यास गंभीर धोका निर्माण करू शकतात, अशी माहिती समोर आली आहे.

भारत देशात विक्रीसाठी परवानगी नसताना ही उत्पादने संगमनेरपर्यंत कोणत्या मार्गाने पोहोचली, याचा तपास सुरू आहे. पोलिस निरीक्षक समीर बारवकर, उपनिरीक्षक श्रीकांत सावंत, विजय खुळे, बाबासाहेब सातपुते, विजय आगलावे, सागर नागरे यांच्या पथकाने औषध प्रशासनाच्या सहकार्याने ही कारवाई केली.

# उपक्रमशील, विद्यार्थीप्रिय शिक्षक केशव बाळसराफ यांचा पारेगाव शाळेत सत्कार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पारेगाव बुद्रुक येथे गेली दहा वर्षे सेवाभावी, विद्यार्थीप्रिय आणि तंत्रस्नेही शिक्षक म्हणून उल्लेखनीय कार्य करणारे केशव बाळसराफ यांचा शाळा व्यवस्थापन समिती व शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शरद गडाख होते. यावेळी मुख्याध्यापक साहेबराव गायकवाड यांनी बाळसराफ यांच्या कार्याचा गौरव करताना, त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले असून, त्यांनी शाळेची गुणवत्ता उंचावण्यात मोलाचे योगदान दिले आहे, असे सांगितले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने केशव बाळसराफ यांना सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. प्रमुख पाहुणे तथा ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण गडाख यांनी मराठी शाळांमधील शिक्षक विद्यार्थ्यांची आईप्रमाणे काळजी घेत असल्याने पालकांचा मराठी शाळांवरील विश्वास अधिक दृढ होत असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमात नुकतेच बदली होऊन आलेले तंत्रस्नेही शिक्षक गणपत गोडे यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी विद्यार्थी विधी, प्रांजल, श्रुती, गौरी गडाख आदींनी केशव बाळसराफ यांच्या कार्याबद्दल मनोगत व्यक्त केले. आपल्या लाडक्या शिक्षकांविषयी बोलताना अनेक विद्यार्थ्यांना भावना अनावर झाल्या.

सहकारी शिक्षक नंदू कुडेकर आणि सुरेखा भालेराव यांनीही मनोगत व्यक्त करून बाळसराफ यांच्या कार्याचे कौतुक केले.

कार्यक्रमास अशोक झोडगे, प्रभाकर काळे, बाळासाहेब पाबळे, पालक, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार पदवीधर शिक्षक सुखदेव इल्हे यांनी मानले.

# 'एसएमबीटी' - 'स्वयं टॉक्स' यांच्या 'बियॉन्ड मेडिसीन' या संयुक्त उपक्रमातून मानवतेचा अमूल्य संदेश

युवावार्ता (प्रतिनिधी)

नंदी हिल्स - एखादा प्रश्न समोर उभा राहिला तर त्यावर मीच का उपाय शोधू नये? या जिद्दीतून सुरू झालेला प्रवास आज हजारो दिव्यांगांसाठी आशेचा किरण ठरला आहे. एसएमबीटी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस अँड रिसर्च सेंटर येथे आयोजित 'स्वयं टॉक्स'च्या 'बियॉन्ड मेडिसीन' उपक्रमात सामाजिक उद्योजक प्रशांत गाढे आणि 'सेवांकुर भारत'चे संस्थापक डॉ. अश्विनिकुमार तुपकरी यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाचा वेध घेण्यात आला. नविन काळे यांनी घेतलेल्या संवादातून आरोग्य सेवेतील मानवी मूल्ये आणि संवेदनशीलतेचे महत्त्व अधोरेखित झाले. कार्यक्रमाला बोर्ड मेंबर श्रीराम कुऱ्हे, अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगांवकर, उपअधिष्ठाता डॉ. संदीप लांबे, व्यवस्थापन अधिकारी डॉ. सौरभ पाटील यांच्यासह शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची मोठी




उपस्थिती होती.

रोबोटिक हात विकसित करणारे प्रशांत गाढे यांनी आपल्या संघर्षमय प्रवासाची कहाणी सांगितली. एमआयटी (चखढ) सोडल्यानंतर अनेकांनी टीका केली, मात्र त्यांनी ध्येय सोडले नाही. अडीच लाख रुपयांचा रोबोटिक हात सर्वसामान्यांना परवडावा म्हणून त्याची किंमत कमी करत त्यांनी सिलिकॉन आणि नव्या तंत्रज्ञानाच्या मदतीने अत्यल्प खर्चात आधुनिक रोबोटिक हात विकसित केला.

त्यांच्या कार्याची दखल 'कोण बनेगा करोडपती' मध्ये घेण्यात आली. ज्येष्ठ समाजसेविका सुधा मूर्ती यांनी त्यांच्या संशोधनाचे कौतुक करत इन्फोसिस फाउंडेशनच्या सहकार्याची ग्वाही दिली. 'मिलाप कॅम्पेन'मधील व्हिडिओला ८० दशलक्ष व्ह्यूज मिळाले आणि ३ कोटी रुपयांचा निधी उभारण्यात यश आले. आजपर्यंत २० हजारांहून अधिक रोबोटिक हात गरजूंना मोफत वितरित करण्यात आले आहेत.

रुग्ण आणि डॉक्टर यांचे नाते उपचारांपलीकडे जाऊन मानवी संवेदनांनी जोडलेले असले पाहिजे. अडचणींना सामोरे गेल्यास स्वप्ने निश्चित पूर्ण होतात, असे प्रतिपादन प्रशांत गाढे यांनी केले.

दुसऱ्या सत्रात डॉ. अश्विनिकुमार तुपकरी यांनी सेवाभावी आरोग्य व्यवस्थेवर भर दिला. थिंक ग्लोबली, क्ट लोकली या सूत्रानुसार ग्रामीण भागातील रुग्णांनाही दर्जेदार आरोग्यसेवा मिळाली पाहिजे, असे ते म्हणाले. 'सेवांकुर'ची स्थापना, सामाजिक बांधिलकी आणि अभावग्रस्तांसाठी केलेल्या कार्याचा त्यांनी आढावा घेतला. जे आपल्याकडे आहे आणि दुसऱ्याकडे नाही, ते देण्याची भावना जपली पाहिजे. संवेदनशीलता ही सेवेचा पाया आहे, असे सांगत त्यांनी वैद्यकीय विद्यार्थ्यांना 'वन वीक फॉर नेशन' आणि 'वन अव्हर फॉर नेशन' उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व मुलाखत नविन काळे यांनी केली. एसएमबीटी ऑडिटोरियममध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमाला वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थी, डॉक्टर आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

**द्यकीय शिक्षण केवळ पुस्तकी ज्ञान आणि तांत्रिक उपचारापुरते मर्यादित नसून, रुग्णांप्रती असणारी सहानुभूती, सामाजिक जबाबदारी आणि प्रभावी संवादकौशल्य हा त्याचा खरा आत्मा आहे. काही दशकांपूर्वी वैद्यकीय सेवा देताना 'रुग्णामधील व्यक्तीला समजून घेणे' हा मूळ विचार होता, जो आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञान-आधारित वैद्यकीय युगात कुठेतरी मागे पडत चालला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून आपल्याला याच मानवी मूल्यांचा पुनर्शोध घ्यायचा आहे. स्वयं टॉक्स सोबत झालेल्या 'बियॉन्ड मेडिसीन' या सामंजस्य करारामधे (चेण) विद्यार्थ्यांना विद्यार्थी प्रतिक्रिया तसेच विद्यार्थ्यांचे प्रवास वर्णन त्यांचे ग्रुप्स तसेच या क्षेत्रात मध्ये काम करणाऱ्या प्रभावी व्यक्तिमतत्वांची भेट असे उपक्रम वर्षभर राबवले जातील. विद्यार्थ्यांना भविष्यात केवळ कुशलच नव्हे, तर संवेदनशील आणि सामाजिक भान असलेले डॉक्टर घडवण्यासाठी हा करार अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरेल.**

**डॉ. मीनल मोहगांवकर**

**(संचालक - अकॅडमिक्स, एसएमबीटी सेवाभावी ट्रस्ट)**

# आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेतृत्व हरपले

## अशोक गायकवाड यांना निरोप



सोनई

अहिल्यानगर जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ आणि अभ्यासू नेतृत्व असलेले रिपब्लिकन नेते अशोक गायकवाड (वय ७२) यांचे रविवारी सायंकाळी ब्रेन हॅमरेजमुळे उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या निधनाने रिपब्लिकन चळवळ आणि सामाजिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

शनिवारी पक्षाच्या संघटनात्मक कामानिमित्त ते श्रीरामपूर येथे गेले होते. तेथे अचानक प्रकृती बिघडल्याने त्यांना तातडीने अहिल्यानगर येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय तपासणीत त्यांना ब्रेन हॅमरेज झाल्याचे निदान झाले. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न करूनही रविवारी सायंकाळी त्यांची प्राणज्योत मावळली.

मूळचे नेवासा तालुक्यातील चांदा येथील रहिवासी असलेले अशोक गायकवाड अहिल्यानगर येथे स्थायिक झाले होते. अनेक दशकांपासून आंबेडकरी विचारांचा प्रचार आणि रिपब्लिकन पक्षाचे

संघटन बळकट करण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. ते सोनई येथील मुळा सहकारी साखर कारखान्याचे संचालक होते. तसेच माजी खासदार यशवंतराव गडाख यांचे ते निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून ओळखले जात.

त्यांच्या पार्थिवावर सोमवारी दुपारी १२ वाजता अहिल्यानगर येथील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या निधनाबद्दल नेवासा तालुक्यासह जिल्ह्यातून हळहळ व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
We treat He cure's
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्यूरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# त्वचेच्या आजारांवर वेळेत उपचार आवश्यक - डॉ. दिग्विजय शिंदे

## मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेरचे आवाहन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पावसाळ्यात वाढलेली आर्द्रता, सतत ओलसर राहणारे कपडे आणि वैयक्तिक स्वच्छतेकडे होणारे दुर्लक्ष यामुळे त्वचेच्या विविध आजारांचे प्रमाण लक्षणीय वाढत असल्याची माहिती मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेर येथील फिजिशियन डॉ. दिग्विजय शिंदे यांनी दिली. त्वचेवरील किरकोळ वाटणाऱ्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता त्वरित तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेण्याचे आवाहन त्यांनी केले.



डॉ. शिंदे यांनी सांगितले की, पावसाळ्यात बुरशीजन्य संसर्ग (फंगल इन्फेक्शन), खाज, त्वचेवर पुरळ, पायांवरील संसर्ग, ॲलर्जी, एक्झिमा तसेच त्वचेवरील लालसरपणा अशा समस्या मोठ्या प्रमाणात आढळून येतात. विशेषतः ओलसर वातावरणामुळे त्वचेवर बुरशीची वाढ वेगाने होते. त्यामुळे वेळेत उपचार न केल्यास संसर्ग वाढून त्रास अधिक गंभीर होऊ शकतो.

त्वचेचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी काही साध्या पण महत्वाच्या सवयी अंगीकारण्याचा सल्लाही त्यांनी दिला. दररोज अंघोळ करून शरीर पूर्णपणे कोरडे ठेवावे, सुती व सैलसर कपड्यांचा वापर करावा, भिजलेले कपडे त्वरित बदलावेत, इतरांचे टॉवेल किंवा कपडे वापरणे टाळावे आणि वैयक्तिक स्वच्छतेची विशेष काळजी घ्यावी. तसेच त्वचेवर खाज, पुरळ, लालसरपणा किंवा संसर्गाची लक्षणे दिसल्यास स्वतःहून औषधे किंवा क्रीम वापरण्याऐवजी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेर येथे जनरल मेडिसिन, त्वचारोग, हृदयरोग, अस्थिरोग, स्त्रीरोग, बालरोग, न्यूरोसर्जरी, नेफ्रोलॉजी, जनरल सर्जरी यांसह विविध विशेषज्ञ विभागांमार्फत अत्याधुनिक वैद्यकीय सेवा उपलब्ध असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

पावसाळ्यात त्वचेच्या समस्या किरकोळ समजून दुर्लक्ष न करता योग्य वेळी निदान आणि उपचार घेतल्यास गंभीर गुंतागुंत टाळता येते. त्यामुळे कोणतीही लक्षणे आढळल्यास विलंब न करता तज्ज्ञांचा सल्ला घेण्याचे आवाहन डॉ. दिग्विजय शिंदे यांनी केले.

# जुलैअखेर राज्यातील धरणांमध्ये ६६.७९ टक्के पाणीसाठा

## भंडारदरा-निळवंडे भरले, शेतकऱ्यांना दिलासा



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - जुलै महिन्याच्या अखेरीस राज्यातील ३,०२९ मोठे, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पांमध्ये ६६.७९ टक्के (९६२.०१ टीएमसी) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध झाला असून, जुलैच्या शेवटच्या पंधरवड्यात झालेल्या जोरदार पावसामुळे तब्बल ३१८.४३ टीएमसी नव्या पाण्याची भर पडली आहे. ही माहिती जलसंपत्ती अभ्यासक व सेवानिवृत्त अभियंता इंजी. हरिश्चंद्र र. चकोर यांनी दिली.

गतवर्षी ३१ जुलैअखेर राज्यातील उपयुक्त पाणीसाठा ७०.९२ टक्के (१,०२१.५० टीएमसी) होता. यंदा तो ५९.४९ टीएमसी (४.१३ टक्के) कमी असला, तरी पावसाळ्याचे दोन महिने शिल्लक असल्याने राज्यातील बहुतांश धरणे शंभर टक्के क्षमतेने भरतील, असा विश्वास इंजि. चकोर यांनी व्यक्त केला.

राज्यातील विभागनिहाय पाणीसाठ्यात कोकण विभाग ८३.९० टक्क्यांसह अव्वल, तर पुणे विभाग ८०.७४ टक्क्यांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. मराठवाडा विभागात केवळ ४१.२८ टक्के पाणीसाठा असल्याने ही बाब चिंताजनक असल्याचे त्यांनी नमूद केले.

अहिल्यानगर व मराठवाड्यासाठी जीवनदायिनी ठरणाऱ्या जायकवाडी धरणात ७६.५४ टक्के (५८.६८२ टीएमसी) उपयुक्त पाणीसाठा झाला असून, आतापर्यंत ३८.६३ टीएमसी नवीन पाण्याची आवक झाली आहे. समन्यायी पाणी वाटप कायदा २००५ नुसार आवश्यक ६५ टक्के साठा पूर्ण झाल्याने नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यातील धरणांतून जायकवाडीकडे पाणी सोडण्याची गरज उरलेली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील शेती व पिण्याच्या पाण्यासाठी महत्त्वाच्या १३ प्रकल्पांमध्ये ४५.४३२ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध असून तो गतवर्षीपेक्षा ५.०४ टीएमसीने कमी आहे. मात्र, जुलैच्या अखेरीस भंडारदरा व निळवंडे धरणे जवळपास १०० टक्के भरल्याने लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

नाशिक विभागातील धरणांमध्ये ८३.९७ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून, गंगापूर धरणात ८१.५३ टक्के, तर दारणा धरणात ८५.५१ टक्के पाणीसाठा झाल्याने नाशिक शहराच्या पिण्याच्या पाण्याची चिंता सध्या दूर झाली आहे.

पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण समूहात ९७ टक्के (२८.१६ टीएमसी) पाणीसाठा झाला असून, सध्या पिण्याच्या पाण्याचे संकट टळल्याचे चित्र आहे. राज्यातील सर्वात मोठ्या उजनी धरणात जवळपास शंभर टक्के साठा झाला असून, यंदा ८५.४२ टीएमसी नवीन पाणी जमा झाले आहे. तर कोयना धरणात ८५.५४ टक्के (९०.०३ टीएमसी) साठा असून, त्यात ७६.३६ टीएमसी नवीन पाण्याची भर पडली आहे.

यंदा सर्वाधिक ५,३४८ मि.मी. पाऊस मुळशी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात, तर सर्वात कमी १४० मि.मी. पाऊस अहिल्यानगर जिल्ह्यातील लोणी येथे नोंदविण्यात आला आहे. सध्या तापी नदीवरील सारंखेडा येथे ४.०४ लाख क्युसेक्स इतका सर्वाधिक पाणी विसर्ग सुरू आहे.

# अकलापूरच्या दत्त विद्यालयात घारगाव पोलिसांचा जनजागृतीपर संवाद कार्यक्रम



युवावार्ता (प्रतिनिधी)

तालुक्याच्या पठार भागातील अकलापूर येथील दत्त विद्यालयात गुरुवार दिनांक. ३० जुलै रोजी घारगाव पोलिस ठाण्याच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी जनजागृतीपर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात घारगाव पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांनी विद्यार्थ्यांशी विविध सामाजिक व कायदेविषयक विषयांवर संवाद साधत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

यावेळी व्यासपीठावर पोलीस उपनिरीक्षक प्रवीण महाले, पोलिस पाटील सिताराम आभाळे , मुख्याध्यापक अशोक काकडे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाच्या वतीने सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांनी विद्यार्थ्यांना रस्ते वाहतूक नियमांचे पालन करण्याचे महत्त्व पटवून दिले. दुचाकी चालविताना हेल्मेटचा वापर, वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळणे, वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे याबाबत त्यांनी विशेष आवाहन केले.

सायबर गुन्ह्यांबाबत जागरूक राहण्याचे आवाहन करत त्यांनी सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर, अनोळखी लिंकवर क्लिक न करणे, ओटीपी किंवा बँक खात्याची गोपनीय माहिती कोणालाही न देणे, ऑनलाइन फसवणुकीपासून सावध राहणे याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच अमली पदार्थांचे दुष्परिणाम, त्यापासून दूर राहण्याची गरज आणि व्यसनमुक्त समाज घडविण्यात विद्यार्थ्यांची भूमिका यावरही त्यांनी सविस्तर माहिती दिली.

याशिवाय कोणत्याही आपत्कालीन प्रसंगी पोलिसांशी संपर्क कसा साधायचा, आपत्कालीन सेवा क्रमांकांचा योग्य वापर कसा करायचा, तसेच संकटाच्या वेळी धैर्याने आणि जबाबदारीने कसे वागावे याबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही विविध प्रश्न विचारत या संवादात्मक कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

पान १ वरून -

## प्राथमिक शिक्षक बँकेच्या...

गुरुमाऊली मंडळाचे अध्यक्ष संतोष दुसुंगे यांनी या विषयावर सखोल चर्चा व्हावी, अशी मागणी केली. त्यानंतर गुरुमाऊली मंडळाचे नेते बापूसाहेब तांबे यांनी हा विषय सध्या स्थगित ठेवत दिवाळीनंतर तीन ते चार महिन्यांत विशेष सर्वसाधारण सभा बोलावून त्यावर स्वतंत्र निर्णय घेण्यात येईल, अशी घोषणा केली. या घोषणेनंतर वातावरण काहीसे शांत झाले.

दुपारच्या भोजनासाठी सभा तहकूब करण्यात आली. भोजनानंतर सभासदांना बोलण्याची संधी दिली जाईल, असे अध्यक्षांकडून स्पष्ट करण्यात आले. मात्र, विरोधी गटाचे प्रवीण ठुबे यांनी त्यावेळीही आपले भाषण सुरूच ठेवले. त्यांनी सभासदांना भोजनावर बहिष्कार घालण्याचे आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला त्यांच्या गटातील कार्यकर्त्यांनी प्रतिसाद दिला असला तरी बहुसंख्य सभासदांनी भोजनाचा लाभ घेतल्याची माहिती ज्येष्ठ नेते बबन गाडेकर यांनी दिली. सभेत सभासदांच्या हिताचे महत्त्वाचे निर्णय जाहीर होताच काही शिक्षक नेत्यांनी गुरुमाऊली मंडळात प्रवेश केला. पदवीधर संघाचे ज्येष्ठ नेते जालिंदर गोरे, सुनील नरसाळे, अप्पासाहेब मांडगे, दत्तात्रेय धामणे आणि मुख्याध्यापक संजय झावरे यांनी गुरुमाऊली मंडळात प्रवेश करत, बापूसाहेब तांबे हेच शिक्षकांचे प्रश्न प्रभावीपणे सोडवू शकतात, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी जिल्हा संघाचे अध्यक्ष बबन गाडेकर, राजेंद्र ठोकळ, साहेबराव अनाप, नारायण पिसे, बाळासाहेब तापकिर, प्रकाश नांगरे, प्रल्हाद भालेकर, दशरथ देशमुख, अनिल टकले, नवनाथ दिवटे, संदीप ठाणगे, अनिल शिंदे, दत्ता सिनारे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## रतनबाई बिडवे यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - धांदरफळ खुर्द येथील रतनबाई दत्तात्रय बिडवे यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या मनमिळाऊ व धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले व दोन मुली असून शिक्षक बाळासाहेब बिडवे,श्रीकांत बिडवे, रेल्वे मोटार पायलट अनिल बिडवे यांच्या त्या मातोश्री होत.

# चार दशकांच्या सहप्रवासातील ऋषितुल्य नेतृत्व : डॉ. सुधीर तांबे

एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वातील असाधारण गुण आणि तिच्या कर्तृत्वाची खरी खोली समजून घ्यायची असेल, तर त्या व्यक्तीच्या जीवनकार्याचं अनेक वर्षे अतिशय जवळून आणि बारकाईने निरीक्षण करण्याचं सौभाग्य लाभावं लागतं आणी मला ते लाभले.मा. डॉ. सुधीर तांबे साहेबांच्या लोककल्याणकारी कार्याचा, विचारांचा आणि कार्यकुशलतेचा प्रत्यक्ष साक्षीदार होण्याचे भाग्यही मला लाभले. आमच्या या चार दशकांच्या अखंड सहप्रवासाला, स्नेहबंधांना आणि त्यांच्या उत्तुंग कार्यकर्तृत्वाला शब्दबद्ध करण्यासाठीच या लेखमालेचा प्रपंच मैत्री दिनाच्या निमित्ताने मांडला आहे. त्यांच्या यशस्वी ४० वर्षांच्या सार्वजनिक आणि स्नेहाच्या प्रवासाचा कृतज्ञतापूर्वक वेध घेणारा हा एक नम्र प्रयत्न...




वरवरच्या प्रसिद्धीच्या आणि राजकीय झगमगाटाच्या पलीकडे जाऊन ज्या वेळी आपण अशा व्यक्तिमत्त्वाचा प्रवास पाहतो, तेव्हाच त्यांच्या उत्तुंग कार्याची खरी प्रचीती येते. महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक पटलावर आपल्या विशेष कार्यशैलीने वेगळा ठसा उमटवणारे डॉ. सुधीर तांबे हे अशाच मोजक्या, ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत.

आपल्याकडे कार्यक्षेत्रात किंवा सार्वजनिक जीवनात पद आणि अधिकाराचा अहंकार सहज निर्माण होतो. मात्र, डॉ. सुधीर तांबे याला पूर्णपणे अपवाद आहेत. कसल्याही अहंकारापासून मुक्त, स्वतःच्या नावाचा किंवा मोठेपणाचा कोणताही गवगवा न करता अत्यंत निष्ठेने काम करत राहणे, हा त्यांचा अंगभूत स्वभाव आहे. प्रसिद्धीच्या झोतात राहण्यापेक्षा कामाची गुणवत्ता आणि समाजाला मिळणारा प्रत्यक्ष दिलासा यालाच त्यांनी नेहमी प्राधान्य दिले.त्यांच्या प्रत्येक संकल्पनेमागे आणि उपक्रमामागे एक अथांग संकुचित वृत्ती न ठेवता सर्वांचा स्वीकार करणारे आणि क्षमाशील असणारे मोठे मन आणि व्यापक दृष्टी दिसून येते. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचावा, गोरगरीब व दुर्लक्षित वर्गाला मुख्य प्रवाहात आणता यावे, तसेच तरुण पिढीला रोजगाराभिमुख आणि मूल्यवर्धित शिक्षण मिळावे, या एकाच ध्येयाने त्यांचे कार्य अविरत सुरू असते.

निरपेक्ष सेवा आणि समाजाविषयीचे उत्तरदायित्व

आजच्या काळात जिथे प्रत्येक कामामागे काही ना काही परतफेडीची किंवा परताव्याची (ठशुरीव) अपेक्षा ठेवली जाते, तिथे डॉ. तांबे यांचे कार्य पूर्णपणे निरपेक्ष ठरते. कसल्याही लाभाची पुसटशीही अपेक्षा न ठेवता, समाज आणि सृष्टीचे आपण काही देणे लागतो या नैतिक भावनेतून त्यांनी आयुष्यभर योगदान दिले आहे.

उत्कृष्ट आणि निष्ठावंत कार्याची खरी व्याख्या हीच असते की, ते केवळ एका मानवी हयातीपुरते मर्यादित न राहता काळाच्या कसोटीवर अढळ टिकून राहते. डॉ. तांबे यांनी उभी केलेली संस्थात्मक कामे, शैक्षणिक क्रांती, आरोग्य क्षेत्रातील सढळ मदत आणि घडवलेली मूल्याधारित माणसे हे असे योगदान आहे, जे काळाच्या प्रवाहातही आपली अविस्मरणीय आणि न पुसली जाणारी छाप सोडून जाईल.झाडे लावणे सोपे असते, पण ती जगवणे आणि त्या विचाराची एक अखंड परंपरा निर्माण करणे अत्यंत कठीण असते. श्रद्धेय स्व.भाऊसाहेबांचे(दादांचे )मार्गदर्शन, आदरणीय दुर्गाताईंची संकल्पना आणि डॉ. सुधीर तांबे यांचे समर्पण यामुळेच आज ही चळवळ संगमनेर पूर्ती न राहता महाराष्ट्रासाठी एक दीपस्तंभ ठरली आहे. निसर्गाचे ऋण फेडणारी ही हरितक्रांती येणाऱ्या पिढ्यांसाठी सदैव मार्गदर्शक आणि प्रेरणादायी राहील.डॉ . सुधीर तांबे साहेब यांचा ४० वर्षांच्या सार्वजनिक जीवनाचा पट मांडताना एक जाणीव विशेषत्वाने अधोरेखित करावीशी वाटते ती म्हणजे डॉ तांबे साहेब आणी आदरणीय बाळासाहेब थोरात साहेब यांच जमलेलं समीकरण! या चार दशकांत दोघांची केमिस्ट्री इतकी सुंदर जुळली की, दोघेही एकमेकांचे विचार अन् भावना न बोलताही समजून घेतात.

या परस्पर समंजसपणाचा दोघांनाही वैयक्तिक आणि राजकीयदृष्ट्या तर फायदा झालाच, पण त्याहून अधिक आनंद याचा आहे की, या एकत्रित ताकदीचा उपयोग जनतेच्या सेवेसाठी आणि भागाच्या विकासासाठी झाला.

डॉ. सुधीर तांबे म्हणजे केवळ एक नेतृत्व किंवा लोकप्रतिनिधी नाहीत; तर ती निसर्गासारखी निरंतर देण्याची सवय असलेली एक निरपेक्ष जीवनशैली आहे. सामाजिक बांधिलकी, नैतिक मूल्ये आणि अथांग औदार्य यांचा हा सुंदर संगम येणाऱ्या कित्येक पिढ्यांसाठी प्रेरणादायी मार्गदर्शक ठरत राहील.

**डॉ.नामदेव गुंजाळ**
**संगमनेर, मो. ९८२२०६०६०४**

HAPPY Birthday

आ. अशितोष काळे
आमदार - कोपरगाव विधानसभा

मा. श्री विक्रम नवले
अध्यक्ष, बुवासाहेब नवले मल्टीस्टेट सोसायटी

डॉ. सोमेश वैद्य
गीतांजली हॉस्पिटल
दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

## संपादकीय...

# पावसाचा दोष की निकृष्ट कामांचे दुष्परिणाम ?

पावसाळा सुरू झाला की महाराष्ट्रातील नागरिकांसमोर उभा राहणारा सर्वात मोठा प्रश्न म्हणजे रस्त्यांवरील खड्डे. ज्या रस्त्यांवरून विकासाची वाटचाल व्हायला हवी, तेच रस्ते आज नागरिकांच्या जीवावर उठले आहेत. मुंबई, पुणे, नाशिक, ठाणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर अशा मोठ्या शहरांपासून ते छोट्या गावांपर्यंत एकच चित्र दिसते-रस्ते कमी आणि खड्डे जास्त. काही ठिकाणी तर रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यांत रस्ता? असा प्रश्न पडावा, इतकी बिकट अवस्था आहे. ही केवळ गैरसोय नाही, तर प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर आणि विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उभे करणारी गंभीर बाब आहे. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांना बसतो. रोज नोकरीसाठी, व्यवसायासाठी किंवा शिक्षणासाठी प्रवास करणाऱ्या लाखो नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. दुचाकीस्वारांसाठी तर प्रत्येक खड्डा हा संभाव्य अपघाताचा धोका बनला आहे. अनेकदा रात्री पावसाच्या पाण्याने भरलेले खड्डे दिसतही नाहीत आणि क्षणार्धात अपघात घडतो. रुग्णवाहिका वेळेत रुग्णालयात पोहोचत नाहीत, शालेय बसमधील विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागतो, तर मालवाहतूक करणाऱ्या वाहनांचेही मोठे आर्थिक नुकसान होते. दरवर्षी पावसाळ्यात खड्ड्यांमुळे शेकडो अपघात होतात. अनेक कुटुंबांचे आधारवड असलेले नागरिक या अपघातांत मृत्युमुखी पडतात. अनेकांना कायमस्वरूपी अपंगत्व येते. काही दिवसांपूर्वी नाशिकमध्ये खड्ड्यांमुळे चार जणांचा मृत्यू झाल्याची घटना संपूर्ण राज्याला हादरवून गेली. अशा घटना केवळ नाशिकपुरत्या मर्यादित नाहीत. राज्यातील अनेक शहरांमध्ये आणि राष्ट्रीय महामार्गांवरही खड्ड्यांमुळे जीवितहानी होत आहे. प्रत्येक अपघातानंतर चौकशीची घोषणा होते, जबाबदारी निश्चित करण्याचे आश्वासन दिले जाते; मात्र काही दिवसांनी सर्व काही पूर्ववत होते. प्रश्न असा आहे की, दरवर्षी रस्त्यांसाठी हजारो कोटी रुपयांचा निधी खर्च होतो, तरी रस्ते काही महिन्यांतच उखडतात कसे? यामागे निकृष्ट दर्जाचे साहित्य, कामातील हलगर्जीपणा, देखरेखीचा अभाव आणि भ्रष्टाचार ही प्रमुख कारणे असल्याचे वारंवार समोर येते. अनेक ठिकाणी निविदा प्रक्रियेपासून ते काम पूर्ण होईपर्यंत पारदर्शकता नसल्याची तक्रार केली जाते. काम पूर्ण झाल्यानंतर गुणवत्तेची योग्य तपासणी न करता बिले मंजूर केली जातात. त्यामुळे दोषी ठेकेदारांना कोणतीही भीती राहत नाही. खड्डे बुजविण्याचे कामही अनेकदा केवळ दिखाव्यासाठी केले जाते. पावसात ओल्या रस्त्यावर डांबर टाकून तात्पुरती मलमपट्टी केली जाते. काही दिवसांतच ते डांबर निघून जाते आणि पुन्हा तेच खड्डे उघडे पडतात. परिणामी त्याच रस्त्यावर वारंवार निधी खर्च केला जातो. त्यामुळे नागरिकांच्या मनात असा प्रश्न निर्माण होतो की, रस्ते टिकाऊ करण्यापेक्षा वारंवार दुरुस्ती करण्यातच काहींचे हितसंबंध दडले आहेत का? सार्वजनिक निधीचा असा अपव्यय थांबविणे ही काळाची गरज आहे. आज जगभरात टिकाऊ रस्ते बांधण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. दर्जेदार साहित्य, योग्य जलनिस्सारण व्यवस्था, वेळोवेळी तांत्रिक तपासणी आणि जबाबदारी निश्चित करणारी यंत्रणा यामुळे अनेक देशांमध्ये रस्ते वर्षानुवर्षे टिकतात.

# सह्याद्री विद्यालयाच्या विद्यार्थिनींकडून सीमेवरील सैनिकांना २५०० राख्या भेट



संगमनेर -

ऊन, वारा, पाऊस अंगावर झेलत देशवासीयांच्या रक्षणासाठी सीमेवर कर्तव्य बजावत असलेल्या भारतीय सैन्यातील सर्व जवानांकरता सह्याद्री विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी २५०० राख्या बनवून पाठवल्या आहेत.

जय हिंद महिला मंच, स्वराज्य कल्याण संस्था व सह्याद्री विद्यालय संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे विद्यार्थिनींनी सैनिकांसाठी राख्या बनवल्या व त्या आज पाठवण्यात आल्या आहे. माजी नगराध्यक्ष सौ दुर्गाताई तांबे यांच्या अध्यक्षतेखाली संगमनेर तालुक्यातील माजी सैनिकांनी स्थापन केलेल्या स्वराज्य कल्याण संस्थेच्या सदस्यांकडे या राख्या सुपूर्त करण्यात आल्या.

याप्रसंगी सौ दुर्गा ताई तांबे, विद्यालयाचे मुख्याध्यापक एसएम खेमनर, स्वराज्य संस्थेचे अध्यक्ष मेजर प्रकाश कोटकर, कॅप्टन भिकाजी भागवत, प्यारा कमांडो लक्ष्मणराव ढोले, सुभेदार मेजर गिरीश एरंडे ,कॅप्टन अनिल पावसे, सुभेदार भानुदास पोखरकर ,सुभेदार रघुनाथ पवार, सुभेदार गोविंद खरडे ,रामनाथ ढोले, सुभेदार मेजर गुंजाळ मतकर, सुभेदार प्रकाश पवार, सुभेदार संभाजी पाचारणे व जय हिंद महिला मंचच्या सदस्या सौ सुषमा भालेराव, सौ सुनीता ताई कांदळकर राधिकाताई डॉलर व परदेशी ताई उपस्थित होत्या. तर सह्याद्री महाविद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका सुरेखा दिघे पर्यवेक्षक किशोर देशमुख अण्णासाहेब दिघे, मिरा ढोले, अर्चना घोरपडे, गीताराम शेळके एकनाथ भागवत ,वरपे मॅडम यांसह मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी सौ दुर्गाताई तांबे म्हणाले की, भारतीय सैनिक हे ऊन ,वारा ,पाऊस यांची परवा न करता देशवासी यांचे सदैव रक्षण करत असतात. सणासुदीच्या काळात त्यांना घरी येणे जमत नाही. त्यांच्या या कर्तव्यप्रती कृतज्ञता म्हणून लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली आपण दरवर्षी त्यांना सीमेवर राख्या पाठवत असतो. यावर्षीही सह्याद्री विद्यालयातील विद्यार्थिनींनी सैनिकांसाठी राख्या बनवून त्या पाठवल्या आहेत. शेतकरी व सैनिक यांच्या प्रति प्रत्येकानेच कृतज्ञता बाळगावी असेही त्या यावेळी म्हणाल्या.

तर मेजर प्रकाश कोटकर म्हणाले की, युवकांमध्ये देशप्रेम निर्माण व्हावे देशभक्ती व त्रोत भरून राहावी म्हणून आपण या अनोख्या उपक्रमाची सुरुवात केली आहे. सैनिक आपले घरदार सोडून सीमेवर शत्रूपासून आपले संरक्षण करतात त्यांच्या प्रति सर्वांच्या मनात कृतज्ञता वाढावी. देशभक्ती जागृत व्हावी हे गरजेचे आहे.

# मालपाणी विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील मालपाणी विद्यालयात १ ऑगस्ट रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विविध भाषणे, पोवाडे व गीतांच्या सादरीकरणातून कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाला पालक प्रतिनिधी तथा माजी विद्यार्थी अमोल नगरकर (सी.ए.), मुख्याध्यापक उत्तम एरंडे व पर्यवेक्षिका रंजना पवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवानी सचिन आसावा हिने केले, तर परिचय व सत्कार आराध्य रोहिदास गुंजाळ यांनी करून दिला. याप्रसंगी आराध्या अमोल सस्कर, स्वरा सचिन नाईकवाडी, स्वराज मंगेश कडलग, आर्या श्रीकांत गोडसे, श्रीनिधी महेंद्र वराडे व कार्तिकी धोंडू गोडे यांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे केली.

विघ्नेश अंबादास बुलाखे यांनी लोकमान्य टिळक यांच्या स्वातंत्र्य चळवळीवर आधारित 'असा लढा भारतीयांनी दिला' हा ज्वलंत पोवाडा सादर केला. तसेच शिक्षक अंबादास बुलाखे यांनी 'अण्णाभाऊ साठे साहित्याची खाण' हे कृतीयुक्त गीत सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. या दोन्ही गीतांना संगीत शिक्षक मंगेश बिडवे यांनी संगीत साथ केली .

पालक प्रतिनिधी व माजी विद्यार्थी अमोल नगरकर यांनी शालेय जीवनात मिळालेले संस्कार हाच आपल्या जीवनाचा पाया आहे, असे सांगून विद्यार्थ्यांना अधिकाधिक संस्कार देणारी ही शाळा असल्याचे गौरवोद्गार काढले. तसेच शाळेचा माजी विद्यार्थी असल्याचा अभिमान व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तीर्था विलास उंबरकर व स्वरा सोमनाथ ताजणे यांनी केले, तर रोनक विनोद आडेप यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांसह शिक्षक अंबादास बुलाखे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# कोपरगाव तालुक्यात राष्ट्रसंत जनार्दन स्वामी कॉलेज ऑफ मॅनेजमेंटमध्ये एम.बी.ए. व एम.सी.ए. अभ्यासक्रमांना प्रारंभ

युवावार्ता (प्रतिनिधी)

कोपरगाव - कोपरगाव तालुक्यातील कोकमठाण येथे कार्यरत राष्ट्रसंत जनार्धन स्वामी कॉलेज ऑफ मॅनेजमेंटमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून एम.बी.ए. (Master of Business Administration) आणि एम.सी.ए. (Master of Computer Applications) हे पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. उच्च शिक्षणासाठी गुणवत्तापूर्ण व रोजगाराभिमुख शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने संस्थेने हा महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे.

महाविद्यालयास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE), नवी दिल्ली यांची मान्यता प्राप्त असून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नता प्राप्त झाली आहे. प्रवेश प्रक्रिया केंद्रीय प्रवेश (CAP) पद्धतीने सुरू असून इच्छुक विद्यार्थ्यांनी आपल्या प्राधान्यक्रमात DTE Code : ०५६८५ असलेल्या राष्ट्रसंत जनार्धन स्वामी कॉलेज ऑफ मॅनेजमेंटचा समावेश करण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

महाविद्यालयात आधुनिक संगणक प्रयोगशाळा, अनुभवी व पात्र प्राध्यापक वर्ग, उद्योगाभिमुख अध्यापन, व्यक्तिमत्त्व विकास, इंग्रजी संवाद कौशल्य प्रशिक्षण, कौशल्याधारित उपक्रम तसेच प्रशिक्षण व प्लेसमेंटवर विशेष भर दिला जाणार आहे. विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्राच्या गरजांनुसार सक्षम व स्पर्धात्मक बनविण्यासाठी विविध मूल्यवर्धित उपक्रम राबविण्यात येणार आहेत. अशी माहिती प्रभारी संचालक डॉ. अनिल बेंद्रे यांनी दिली.

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ ज्न्म नोंद/५८५/२०२६ दिनांक - २९/०७/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. तबस्सुम रशीद शेख, रा. कुरण, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी दिनांक १६/०२/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. कुरणे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची स्वत; नामे तबस्सुम रशीद शेख यांचा **जन्म मौजे कुरण, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक ०१/०४/१९७६** रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **जन्म** नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी कुरण यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी कुरण यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ ज्न्म नोंद/५८५/२०२६ दिनांक - २९/०७/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. शफीक अहमद शेख, रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी दिनांक २९/०६/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची आई नामे हजराबी राजमोहम्मद शेख यांचा **जन्म मौजे संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक ०३/०८/१९४८** रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **जन्म** नोंद मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगपरिषद संगमनेर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
PRADIPKUMAR MANHARLAL SETH
TO NEW NAME
PRADIPKUMAR MANOHARLAL SETH
BY AFFIDAVIT NO 970/2026
DATE- 03/08/2026
ADD-A/P GANESH NAGAR, GALLI NO.5,SANGAMNER, DIST.AHILAYANAGAR-422605

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
SARITA MADHUKARRAO KOTWAL
NEW NAME AS
SHUBHANGI HRUSHIKESH DEOKAR
ADD – DEVI ROAD ,TAKALI, KOPARGAON
TAL - KOPARGAON
DIST - AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
SUREKHA DAGADU SONWANE
TO CORRECT NAME
SUREKHA DAGADU SONAWANE
AS ON ADHAR AND PAN FOR ALL PURPOSES

**पाहिजेत**
कापड दुकानासाठी
सेल्समन- २ जागा (पुरूष)
कॉम्प्युटर ऑपरेटर - १ जागा
(कामाची वेळ सकाळी १० ते रात्री १०/ पार्ट टाईम )
(अनुभवास प्राधान्य व आकर्षक पगार )
मेन्स स्टुडिओ
नाशिक-पुणे हायवे लॉ कॉलेज समोर, संगमनेर
8830437076
9822882399

**पाहिजेत**
क्षितिज इलेक्ट्रीकल
घुलेवाडी, ता. संगमनेर
अनुभवी अकाऊंटट पाहिजे - २ जागा
(पुर्णवेळ)
MS Offics Tally
ज्ञान आवश्यक
– संपर्क –
7007608875

**पाहिजेत**
एक पुरुष कर्मचारी/मुलगा
पात्रता - लिहिता वाचता येणे आवश्यक
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल
नवीन नगर रोड संगमनेर
– संपर्क –
7972999316

**पाहिजेत**
दुकान कामासाठी होतकरू मुले पाहिजेत.
हेल्पर / शिलाई कामगार
महिला - पुरूष
आकर्षक पगार दिला जाईल
अमोल कुशन्स
मार्केट यार्ड, संगमनेर
8805647610
8788483245

**फ्लॅट विकणे आहे**
2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
– संपर्क –
8788945208
8208223721

**फॅकल्टी पाहिजे**
अगस्ती अकॅडमी संगमनेर
ऑनलाईन / ऑफलाईन अभ्यासक्रम
पशुधन पर्यवेक्षक भरती कोर्स
पशुवैद्यकीय विज्ञानातील पदविका (Diploma) किंवा पदवी (Degree) आवश्यक.
AMVI – 461 जागा MPSC (सहायक मोटार वाहन निरीक्षक)
यांत्रिक अभियांत्रिकी (Mechanical Engineering) मधील पदवी आवश्यक.
सरळसेवा बॅच २०२६ लवकरच सुरू
MPSC राज्यसेवा | गट B गट C | पोलिस भरती | बँकींग परिक्षा | सर्व स्पर्धा परिक्षा
अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकवर्ग
सविस्तर मार्गदर्शन
नियमित टेस्ट, PYQ सराव व चर्चा
LIVE + Recorded बॅच सुविधा
वैयक्तिक मार्गदर्शन व शंका निरसन
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, संचित बिल्डिंग, पहिला मजला महाराष्ट्र बँकेच्या वरती, संगमनेर - ४२२६०५
6005401510
9209645727

**Declaration**
The names "Tejas Dipak Bhalerao" and "Tejas Deepak Bhalerao" refer to the same person. The correct spelling of the father's name is "Deepak".
Address: Sangamner Khurd, Taluka Sangamner.

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
TOHID KHALIL QURESHI
NEW NAME AS
TOHID KHALIL KURESHI
ADD – MOGALPURA, SANGAMNER,
TAL - SANGAMNER
DIST- AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
ASHOKKUMAR PRAVINCHANDRA BAJANIYA
TO NEW NAME
ASHOK PRAVINCHANDRA BAJANIYA
BY AFFIDAVIT NO. 970/2026
DATE - 03/08/2026
ADD- A/P SWATANTRAYA CHOWK, NEAR NAGARPALIKA MANGAL KARAYALAYA,SANGAMNER, DIST.AHILAYANAGAR-422605

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
SMITAL VIJENDRAKUMAR MEHATA
TO NEW NAME
SMITAL VIJENDRAKUMAR MEHTA
BY AFFIDAVIT NO 969/2026
DATE - 03/08/2026
ADD- A/P JAYPRAKASH ROAD, GANDHI CHOWK,SANGAMNER, DIST.AHILAYANAGAR-422605






## दिनविशेष

२०२०: बेरूत, लेबनॉन स्फोट — येथे झालेल्या भीषण विस्फोटामध्ये किमान २२० लोकांचे निधन तर तर ३ लाख पेक्षा जास्तलोक बेघर.

२००७: फिनिक्स — हे नासाचे अंतराळ यान प्रक्षेपित कण्यात आले.

२००१: — भारतातील पहिली स्किन बँक मुंबई येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात स्थापन झाली.

१९९८: कोरेझॉन ॲक्विनो — फिलिपाइन्सच्या माजी अध्यक्षा, यांना आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठीचा रॅमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर.

१९९३: राजेन्द्र खंडेलवाल — यांनी अपंग असून सुद्धा समुद्रसपाटीपासून १८,३८३ फुट उंचीवर असलेली खारदुंग ला ही खिंड कायनेटिक होंडा स्कूटरवर पार केली. त्याच्या या कामगिरीची गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस मधे नोंद झाली.

१९८४: अपर व्होल्टा / बुर्किना फासो — अपर व्होल्टा या देशाचे नाव बदलुन बुर्किना फासो असे करण्यात आले.

१९५६: भाभा अणुशक्ती केंद्र, तुर्भे — येथे सहावी अणुभट्टी कार्यान्वित झाली.

## जन्म

१९७८: संदीप नाईक — भारतीय राजकारणी

१९७५: जुत्ता उर्पिलेनें — फिनलंड देशाचे उपपंतप्रधान, राजकारणी

१९६८: अबे कुरुविला — भारतीय क्रिकेटपटू आणि प्रशिक्षक

१९६५: फ्रेडरिक रेनफेल्ड — स्वीडन देशाचे ४२वे पंतप्रधान, स्वीडिश सैनिक आणि राजकारणी

१९६५: विशाल भारद्वाज — भारतीय चित्रपट दिग्दर्शक, पटकथा लेखक, निर्माते, संगीतकार आणि पार्श्वगायक

१९६१: बराक ओबामा — अमेरिकेचे ४४ वे आणि पहिले कृष्णवर्णीय राष्ट्राध्यक्ष — नोबेल पुरस्कार

१९५४: अनातोली किनाख — युक्रेन देशाचे ११वे पंतप्रधान, अभियंते आणि राजकारणी

१९५०: एन. रंगास्वामी — पुद्दुचेरी राज्याचे ९वे मुख्यमंत्री,

## मृत्यू

२२१: लेडी झेन — चीनी सम्राज्ञी (जन्म: २६ जानेवारी १८३ )

२०२२: जी. एस. पणिकर — भारतीय चित्रपट दिग्दर्शक, निर्माते आणि पटकथा लेखक

२०२०: शिवाजीराव पाटील निलंगेकर — महाराष्ट्राचे १०वे मुख्यमंत्री (जन्म: ४ ऑगस्ट १९३१ )

२००६: नंदिनी सत्पथी — भारतीय लेखक व राजकारणी (जन्म: ९ जून १९३१ )

२००३: फ्रेडरिक चॅपमॅन रॉबिन्स — अमेरिकन बालरोगतज्ञ आणि विषाणूशास्त्रज्ञ — नोबेल पुरस्कार (जन्म: २५ ऑगस्ट १९१६ )

१९९७: जीन काल्मेंट — १२२ वर्षे आणि १६४ दिवस जगलेल्या फ्रेन्च महिला (जन्म: २१ फेब्रुवारी १८७५ )

१९७७: एडगर एड्रियन — इंग्रजी फिजिओलॉजिस्ट — नोबेल पुरस्कार (जन्म: ३० नोव्हेंबर १८८९ )

१९५७: वॉशिंग्टन लुइस — ब्राझील देशाचे १३वे राष्ट्रपती, वकील आणि राजकारणी (जन्म: २६ ऑक्टोबर १८६९ )

१९३७: डॉ. काशीप्रसाद जायस्वाल — प्राच्यविद्या पंडित व कायदेतज्ञ (जन्म: २७ नोव्हेंबर १८८१




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**०४ ऑगस्ट**

## ‘अप्सरा’ अणुभट्टीच्या कार्यान्वयनाने भारताची अणुयुगात दमदार एंट्री



१९५६ साली भारताच्या अणुऊर्जा कार्यक्रमात एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला. मुंबईजवळील ट्रॉम्बे (आजचे भाभा अणुसंशोधन केंद्र) येथे देशाच्या अणुऊर्जा संशोधनाला नवी दिशा मिळाली. याच काळात अणुऊर्जा क्षेत्रातील विविध संशोधन सुविधा आणि अणुभट्ट्यांच्या उभारणीचे काम वेगाने सुरू झाले. भारताचे अणुऊर्जा कार्यक्रमाचे जनक होमी जहांगीर भाभा यांच्या दूरदृष्टीतून या केंद्राची उभारणी झाली.मात्र, "१९५६ मध्ये भाभा अणुशक्ती केंद्र, तुर्भे येथे सहावी अणुभट्टी कार्यान्वित झाली" हा उल्लेख ऐतिहासिकदृष्ट्या अचूक नाही. १९५६ मध्ये भारताची पहिली संशोधन अणुभट्टी 'अप्सरा' (APSARA) कार्यान्वित झाली होती. आशियातील ही पहिली संशोधन अणुभट्टी मानली जाते. त्यानंतर CIRUS (१९६०), ZERLINA (१९६१), PURNIMA, DHRUVA अशा इतर संशोधन अणुभट्ट्या पुढील काळात सुरू झाल्या. त्यामुळे १९५६ मध्ये "सहावी अणुभट्टी" सुरू झाली, असा दावा चुकीचा आहे.'अप्सरा' अणुभट्टीच्या कार्यान्वयनामुळे भारताने अणुविज्ञान संशोधन, अणुइंधन, किरणोत्सर्ग तंत्रज्ञान, वैद्यकीय संशोधन, शेती आणि उद्योगांसाठी आवश्यक संशोधनात मोठी झेप घेतली. या संशोधनामुळे भारतीय वैज्ञानिकांना स्वदेशी अणुतंत्रज्ञान विकसित करण्याचा आत्मविश्वास मिळाला आणि पुढे अणुऊर्जा निर्मिती तसेच शांततापूर्ण अणुऊर्जेच्या वापराचा पाया मजबूत झाला.आज भाभा अणुसंशोधन केंद्र (B A R C) हे भारतातील अणुविज्ञान, अणुऊर्जा, अणुइंधन, वैद्यकीय समस्थानिक, संरक्षण संशोधन आणि अत्याधुनिक विज्ञान-तंत्रज्ञान संशोधनाचे प्रमुख केंद्र म्हणून जागतिक स्तरावर ओळखले जाते. १९५६ मध्ये सुरू झालेली 'अप्सरा' अणुभट्टी ही भारताच्या वैज्ञानिक स्वावलंबनाच्या प्रवासातील ऐतिहासिक मैलाचा दगड ठरली.

**जयंती विशेष**

## भारतीय क्रिकेटला वेगवान गोलंदाजीची धार देणारे - अबे कुरुविला

भारतीय क्रिकेटच्या इतिहासात वेगवान गोलंदाजांची संख्या तुलनेने कमी असली, तरी आपल्या उंची, अचूक टप्पा आणि शिस्तबद्ध गोलंदाजीच्या जोरावर वेगळी छाप पाडणाऱ्या गोलंदाजांमध्ये अबे कुरुविला यांचे नाव आदराने घेतले जाते. ३ ऑगस्ट १९६८ रोजी मुंबई येथे जन्मलेल्या कुरुविला यांनी भारतीय क्रिकेटमध्ये वेगवान गोलंदाजीला नवी दिशा देण्याचे काम केले. त्यांच्या जन्मदिनी त्यांच्या क्रिकेट कारकिर्दीचा आणि भारतीय क्रिकेटसाठी दिलेल्या योगदानाचा आढावा घेणे औचित्याचे ठरते.तब्बल ६ फूट ६ इंच उंची असलेल्या अबे कुरुविला यांना नैसर्गिक उसळी मिळत असे. त्यांची गोलंदाजी वेगवान, नियंत्रित आणि फलंदाजांसाठी आव्हानात्मक होती. मुंबईच्या क्रिकेट संस्कृतीत घडलेल्या कुरुविला यांनी रणजी करंडक स्पर्धेत सातत्यपूर्ण कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडली. त्या काळात मुंबईच्या गोलंदाजीचे ते प्रमुख आधारस्तंभ मानले जात होते.देशांतर्गत क्रिकेटमधील दमदार कामगिरीच्या जोरावर त्यांना १९९७ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध भारतीय कसोटी संघात पदार्पणाची संधी मिळाली. भारताकडून त्यांनी १० कसोटी सामने खेळताना २५ बळी मिळवले. त्यांच्या कसोटी कारकिर्दीतील सर्वोत्तम गोलंदाजी ५९ धावांत ५ बळी अशी राहिली. आंतरराष्ट्रीय कारकीर्द फार मोठी नसली तरी त्यांनी खेळलेल्या प्रत्येक सामन्यात जिद्द, संयम आणि शिस्त यांचे दर्शन घडवले.अबे कुरुविला यांनी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्येही उल्लेखनीय कामगिरी केली. रणजी करंडक स्पर्धेत मुंबईसाठी



त्यांनी अनेक महत्त्वाच्या सामन्यांमध्ये निर्णायक गोलंदाजी करत संघाच्या यशात मोलाचा वाटा उचलला. देशांतर्गत क्रिकेटमधील त्यांच्या सातत्यपूर्ण प्रदर्शनामुळे ते त्या काळातील विश्वासार्ह वेगवान गोलंदाज म्हणून ओळखले जात होते.क्रिकेटमधून निवृत्तीनंतरही त्यांचा क्रिकेटशी असलेला संबंध कायम राहिला. त्यांनी प्रशिक्षक, मार्गदर्शक आणि क्रिकेट प्रशासक म्हणून विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (BCCI) राष्ट्रीय निवड समितीचे सदस्य म्हणून त्यांनी युवा खेळाडूंना संधी देण्याचे काम केले. तसेच राष्ट्रीय क्रिकेट अकादमी (NCA) आणि विविध प्रशिक्षण शिबिरांमधून उदयोन्मुख वेगवान गोलंदाजांना मार्गदर्शन केले. त्यांच्या अनुभवाचा लाभ अनेक युवा क्रिकेटपटूंना झाला.अबे कुरुविला यांचे व्यक्तिमत्त्व केवळ एक गोलंदाज म्हणूनच मर्यादित राहिले नाही. त्यांनी क्रिकेटमधील शिस्त, मेहनत आणि सातत्य यांचा आदर्श घालून दिला.

# रतनवाडीत काळाचा घाला !

## भिंत कोसळून आठ महिन्यांच्या चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर -अकोले तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील रतनवाडी येथे सोमवारी (दि. ३ ऑगस्ट) मध्यरात्री घडलेल्या हृदयद्रावक दुर्घटनेत राहत्या घराची दगडी भिंत कोसळून अवघ्या आठ महिन्यांच्या सृष्टी अशोक झडे या चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर तिची आई सोनाली अशोक झडे या गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

सोमवारी मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास झडे कुटुंबीय घरात गाढ झोपेत असताना घराच्या पश्चिम बाजूची जुनी दगडी भिंत अचानक कोसळली. या दुर्घटनेत अंथरुणावर झोपलेल्या सृष्टीच्या अंगावर मोठमोठे दगड व मातीचा ढिगारा पडल्याने ती गंभीर जखमी झाली. तिची आई सोनाली याही ढिगाऱ्याखाली सापडून गंभीर जखमी झाल्या.

घटनेनंतर ग्रामस्थांनी तत्काळ मदतकार्य सुरू करून मायलेकीला ढिगाऱ्याखालून बाहेर काढले आणि उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय, राजूर येथे दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सृष्टीला तपासून मृत घोषित केले. सोनाली झडे यांच्या हाताला फ्रॅक्चर झाले असून शरीरावर अनेक ठिकाणी गंभीर दुखापती झाल्या आहेत. या प्रकरणी राजूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास एपीआय किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय परशुराम तागड तसेच पोलीस कर्मचारी श्रीकांत नरोडे, संभाजी सांगळे आणि विनायक कोकणे करीत आहेत.

अकोले तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू असून सततच्या अतिवृष्टीमुळे अनेक कच्ची व दगडी घरे धोकादायक बनली आहेत. काही घरांची पडझडही झाली आहे. अशा परिस्थितीत रतनवाडीतील ही दुर्घटना घडल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. आईच्या कुशीत शांत झोपलेल्या अवघ्या आठ महिन्यांच्या सृष्टीचा क्षणार्धात मृत्यू झाल्याने झडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण अकोले तालुक्यात हळहळ व्यक्त होत असून प्रशासनाने पीडित कुटुंबाला तातडीची आर्थिक मदत व जखमी महिलेवर योग्य उपचाराची व्यवस्था करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, आमदार डॉ. किरण लहामटे यांनी ग्रामीण रुग्णालयात भेट देऊन जखमींची विचारपूस केली तसेच झडे कुटुंबीयांचे सांत्वन केले.

# स्कॉर्पिओची ई-स्कूटीला भीषण धडक

## २०० फूट फरफटत नेल्याने १६ वर्षीय विद्यार्थीनीचा जागीच मृत्यू




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यात रविवारी सकाळी घडलेल्या भीषण अपघातात अवघ्या १६ वर्षीय विद्यार्थिनीचा जागीच मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. क्लाससाठी इलेक्ट्रिक स्कूटीवरून संगमनेरकडे येत असलेल्या आरुषी अनिल कर्पे (वय १६, रा. पिंपळगाव कोझिरा) हिला भरधाव स्कॉर्पिओने जोरदार धडक दिली. धडकेचा वेग इतका प्रचंड होता की विद्यार्थिनीची स्कूटी सुमारे २०० फूटांपर्यंत फरफटत गेल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या भीषण अपघातात आरुषीचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, एमएच १० डीव्ही ३४४७ क्रमांकाची स्कॉर्पिओ भरधाव वेगात येत होती. तक्रारीनुसार, वाहनचालक दारूच्या नशेत असल्याचा आरोप करण्यात आला असून त्याने निष्काळजीपणे वाहन चालवत आरुषीच्या ई-स्कूटीला जोरदार धडक दिली. अपघाताचा आवाज ऐकून परिसरातील नागरिक घटनास्थळी धावले. मात्र गंभीर दुखापतीमुळे आरुषीचा जागीच मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. अभ्यासासाठी घराबाहेर पडलेल्या एका निष्पाप विद्यार्थिनीचा अशा दुर्दैवी अपघातात मृत्यू झाल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. गावासह संपूर्ण परिसरातून बेदरकार वाहनचालकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. या प्रकरणी फिर्यादी भागवत पाटीलबा कर्पे यांच्या तक्रारीवरून स्कॉर्पिओ चालक हेमंत बाळासाहेब गिते (वय ३९, रा. वडाळा महादेव, ता. श्रीरामपूर) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १०६, २८१, ३२४(४) तसेच मोटार वाहन कायद्यातील कलम १८५ (दारू पिऊन वाहन चालविणे), १८४ (धोकादायक वाहनचालक) व १७७ अन्वये संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक व्ही. एन. काळे करीत आहेत.

या घटनेमुळे पुन्हा एकदा भरधाव व बेदरकार वाहनचालनाचा प्रश्न ऐरणीवर आला असून, दारूच्या नशेत वाहन चालविणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आणि रस्ते सुरक्षेच्या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

# ग्रामसभा बंद पाडली, चौघांविरुद्ध गुन्हा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ग्रामसभेबाबत आम्हाला कल्पना दिली नसल्याचे सांगून महिला ग्रामपंचायत अधिकाऱ्यास दमदाटी करून ग्रामसभा बंद पाडल्याची घटना शुक्रवारी तालुक्यातील निंबाळे येथे घडली.

याबाबत पोलिसांनी चार जणांविरुद्ध शासकीय कामात अडथळा आणण्याचा गुन्हा दाखल केला आहे. याबाबत समजलेली माहिती अशी की, ज्योती राहणे या निंबाळे येथे ग्रामपंचायत अधिकारी म्हणून गेल्या पाच वर्षापासून काम पाहत आहे. गटविकास अधिकाऱ्यांच्या आदेशाप्रमाणे निंबाळे गावात ग्रामसभा आयोजित केली होती. या ग्रामसभेबाबत दि. ३० रोजी दुपारी दोन ते तीन वाजेच्या दरम्यान रिक्षा फिरवून रिक्षामध्ये भोगा लावून दवंडी दिली होती. त्यानुसार दि. ३१ रोजी सकाळी पावणे अकरा वाजेच्या सुमारास सभा चालू होण्यापूर्वी सदर ग्रामसभेसाठी सरपंच भागीरथी माधव काठे, उपसरपंच ईर्षा सर्जेराव पर्वत, ग्रामपंचायत सदस्य शाहजान वसीम शेख, कमल लहानु गायकवाड हे ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित होते.

यावेळी निंबाळे गावातील संपत मधुकर पर्वत, नितीन रामदास मेहेत्रे, शशिकांत राजेंद्र गायकवाड, संतोष वसंत पठाडे हे आले. आम्हाला ग्रामसभा आहे हे माहीत नाही. तुम्ही अचानक ग्रामसभा का घेता, अशी विचारणा त्यांनी केली. ग्रामसभेबाबत कालच गावामध्ये भोंगा फिरला असुन सदर सभेबाबात सर्व ग्रामस्थांना कळविले आहे, असे राहणे यांनी सांगितले. नितीन रामदास मेहेत्रे, शशिकांत राजेंद्र गायकवाड, संतोष वसंत पठाडे यांनी तुम्ही काम वेळेत करत जा, असे म्हणून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ दमदाटी केली. या ग्रामस्थांनी ग्रामसभा होवु न देता शासकीय कामात अडथळा आणला. याबाबत निंबाळे येथील ग्रामपंचायत अधिकारी ज्योती राहाणे यांनी संगमनेर शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्या फिर्यादीवरून पोलिसांनी संपत मधुकर पर्वत, नितीन रामदास मेहेत्रे, शशिकांत राजेंद्र गायकवाड, संतोष वसंत पठाडे (सर्व रा. निंबाळे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पान १ वरून -

## ‘चिल्ड्रन बँक’च्या...

असा एकूण १२ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. ही कारवाई शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत सावंत करीत आहेत.

बनावट नोटांच्या आमिषाने मोठा आर्थिक गंडा घालणाऱ्या या टोळीच्या अटकेमुळे अशा फसवणूक करणाऱ्या टोळ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. कोणत्याही प्रकारचे अवास्तव आर्थिक आमिष, कमी पैशांत अधिक पैसे मिळण्याचे प्रस्ताव किंवा संशयास्पद व्यवहार आढळल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन संगमनेर शहर पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

छोट्या जाहिरातासाठी संपर्क करा
8830508244
8380956604
7620388230
दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# बनावट औषधांमुळे डाळिंब बाग उद्ध्वस्त

## आमदार अमोल खताळांनी दिले कारवाईचे निर्देश



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - रात्रीची पावणे बाराची वेळ... सर्वत्र अंधार, पुढे खडतर रस्ता आणि शेवटच्या टोकाला चिंतेने व्याकूळ झालेला एक शेतकरी. अशा प्रतिकूल परिस्थितीतही आमदार अमोल खताळ यांनी कोणताही विलंब न करता थेट शेतकऱ्याच्या घरी जाऊन त्याची व्यथा जाणून घेतली. नुकसान ग्रस्त डाळिंब बागेची पाहणी करत त्यांनी कृषीविभागाच्या अधिकाऱ्यांशी तातडीने संपर्क साधत पंचनामा करून ज्या कृषीसेवाकेंद्राने त्या शेतकर्यास बनावट औषधे दिली त्याची खात्री करून त्या कृषी सेवा केंद्रावर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. या घटनेतून शेतकऱ्यांप्रती असलेली संवेदनशीलता व तळमळ अधोरेखित झाली.


संगमनेर तालुक्यातील पेमगिरी येथील डाळिंब उत्पादक शेतकरी सोमनाथ किसन गोडसे यांनी दोन एकर क्षेत्रातील डाळिंब बागेवरती रासायनिक औषधाची फवारणी केली होती. मात्र फवारणीनंतर त्या बागेचे मोठ्याप्रमाणातनुकसान झाले त्या मुळे गोडसे यांचे सुमारे २५ ते ३० लाख रुपयांचे नुकसान झाले. आणि वर्षभराच्या कष्टांवर पाणी फिरल्याने शेतकरी गोडसे यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले.

आमदार अमोल खताळ हे पेमगिरी येथील एका परिवाराच्या सांत्वनभेटी साठी गेले असता त्यांना सोमनाथ किसन गोडसे यांनी कृषी सेवा केंद्रा तुन रासायनिक औषधे आणतडाळिंब बागेवर फवारणी केली त्यामुळे २५ ते ३० लाख रुपयांचे डाळिंब बागेचे नुकसान झाले आहे. तेव्हा माझ्या डाळिंब बागेची पाहणी करण्यासाठी तुम्ही यावे अशी विनंती गोडसे यांनी आमदार खताळ यांना केली. त्यांच्या विनंतीचा मान ठेवून शनिवारी रात्री साडेअकरा ते पावणे बारा वाजण्या च्या सुमारास त्यांच्या घरी जाण्याचा निर्णय घेतला परंतु घराकडे जाणारा रस्ता खडतर असल्यामुळे गाडी जाऊ शकत नाही. मात्र आमदार खताळ यांनी एका दुधाच्या वाहनात बसून चार ते पाच कि मी आंतर असलेल्या गोडसे यांच्या घरी पोहोचले आणि नुकसानग्रस्त डाळिंब बागेची प्रत्यक्ष पाहणी केली. शेतकरी गोडसे यांनी संपूर्ण घटना व नुकसानीची माहिती आ. खताळ यांना दिली या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी तेथूनच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आणि उपविभागीय कृषी अधिकारी यांना भ्रमणध्वनी संपर्क करून ज्या कृषी सेवा केंद्र चालकाने गोडसे यांना बनावट व बोगस रासायनिक औषधे दिली. त्याची खात्री करून करून त्या कृषी सेवा केंद्रावर कारवाई करावी आणि नियमानुसार त्या शेतकर्यास काय मदत करता येईल याबाबतच्या सूचना आ. खताळ यांनी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

**नुकसानग्रस्त शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्यासाठी माझा प्रयत्न राहणार आहे. कोणत्याही परिस्थिती मध्ये शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडणार नाही. तसेच सोमनाथ गोडसे यांना धीर देत त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याची ग्वाही दिली. आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्याच्या मदतीसाठी मध्यरात्री खडतर वाट तुडवत थेट शेतकऱ्याच्या दारी पोहोचलेल्या आमदार अमोल खताळ यांच्या या कृतीची परिसरात सर्वत्र चर्चा होत आहे.**

# विकासाचे श्रेय घेऊ नका, काम करून दाखवा

## संपतराव डोंगरे यांचा टोला



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - विकसित संगमनेरला अवैध धंद्यांचे आगर बनवणे, लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी मंजूर करून आणलेल्या विकासकामांचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करणे, संगमनेर तालुक्याला शून्य रुपये पीक विमा मिळणे, संगमनेर मार्गे प्रस्तावित नाशिक-पुणे रेल्वे प्रकल्प रद्द होणे, तालुक्याच्या दृष्टीने गैरसोयीच्या नवीन तहसील कार्यालयाच्या प्रस्तावावर मौन बाळगणे, वीजपुरवठ्याची अवस्था बिघडवणे आणि मोठ्या संघर्षातून मिळालेल्या पाण्याचे योग्य नियोजन न करणे ही अवघ्या दीड वर्षांतील अपयशाची यादी आहे. त्यामुळे संगमनेरच्या जनतेने तुमचा खरा चेहरा ओळखला आहे, अशा शब्दांत शेतकी संघाचे चेअरमन संपतराव डोंगरे यांनी नाव न घेता आमदार अमोल खताळ यांच्यावर जोरदार टीका केली.

संपतराव डोंगरे म्हणाले, संगमनेर तालुक्याचा विकास हा लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या सातत्यपूर्ण संघर्षाचा आणि जनतेच्या विश्वासाचा परिणाम आहे. एकेकाळी राज्यातील सर्वाधिक दुष्काळग्रस्त तालुका म्हणून ओळखला जाणारा संगमनेर आज महाराष्ट्रातील सर्वाधिक विकसित तालुक्यांपैकी एक मानला जातो. हा बदल सहज घडलेला नाही, तर दशकांतील नियोजन, संघर्ष आणि विकासदृष्टीचा परिणाम आहे. ते पुढे म्हणाले, १९८५ मध्ये रोजगार हमी योजनेवर सर्वाधिक मजूर काम करणारा तालुका म्हणून संगमनेरची ओळख होती. आज मात्र रोजगारनिर्मिती आणि विकासाच्या संधींमध्ये संगमनेर आघाडीवर आहे. हा इतिहास पुसण्याचा किंवा त्याचे श्रेय दुसऱ्यांनी घेण्याचा प्रयत्न करू नये. स्वतःला निधी आणता येत नसेल किंवा विकासकामे करता येत नसतील तर खोटे आरोप करून जनतेची दिशाभूल करण्याचे काम थांबवावे.

यावेळी उपसरपंच अरुण गुंजाळ यांनीही आमदारांवर टीका करताना म्हटले, विकासकामे, त्यांचा निधी आणि अंमलबजावणी याबाबत कोणतीही माहिती नसताना काही कामांचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. निमज येथे ज्या कामांचे श्रेय घेण्याचा प्रयत्न झाला, त्यामध्ये आमदारांचे कोणतेही योगदान नाही. ग्रामपंचायतीच्या निधीतून झालेल्या दलित वस्ती सुधार योजनेतील २० लाख रुपयांच्या कामात आमदारांचा काय संबंध? राज्यभर राबविण्यात येणाऱ्या अंगणवाडी योजनेचे श्रेयही स्वतःकडे घेण्याचा प्रयत्न केला जात आहे.

गुंजाळ पुढे म्हणाले, जलजीवन प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या कामात आमदारांच्या हस्तक्षेपामुळे आणि त्यांच्या समर्थकांच्या कारभारामुळे अडथळे निर्माण झाले. आज ज्या कामांचे श्रेय घेतले जात आहे, त्यांपैकी अनेक कामांना अद्याप प्रशासकीय मंजुरीही मिळालेली नाही. फ्लेक्सवर कामे दाखवून जनतेची दिशाभूल करण्याऐवजी प्रत्यक्ष विकासावर भर द्यावा. तालुक्यातील सध्याच्या परिस्थितीवर भाष्य करताना संपतराव डोंगरे म्हणाले, गेल्या दीड वर्षांत तालुक्याची विकासाची घडी विस्कटण्याचा प्रयत्न झाला आहे. अवैध धंद्यांना चालना मिळाली, शेतकऱ्यांना शून्य रुपये पीक विमा मिळाला, त्यांच्या प्रश्नांसाठी वारंवार रस्त्यावर उतरावे लागत आहे. मोठ्या प्रयत्नांतून मंजूर झालेला संगमनेर मार्गे नाशिक-पुणे रेल्वे प्रकल्पही आमदार झाल्यानंतर रद्द झाला. याबाबत विचारणा केल्यावर 'ती काही नेहरू गार्डनची रेल्वे आहे का पळवून न्यायला?' असे हे आमदार महोदय बोलत होते, यावरून रेल्वे बाबत ते किती गंभीर होते हे सुद्धा कळाले.

ते पुढे म्हणाले, एकेकाळी संगमनेर तालुक्यातील वीजपुरवठा सुरळीत होता. मात्र गेल्या दीड वर्षांत वीजपुरवठ्याची परिस्थिती बिघडली आहे. या सर्व प्रश्नांवर उत्तर देण्याऐवजी केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोप करण्यात वेळ घालवला जात आहे. शेवटी त्यांनी सांगितले, संगमनेर तालुक्यातील तरुण, महिला, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना हे स्पष्टपणे जाणवले आहे की, संगमनेरच्या हिताचा सातत्याने विचार करणारे नेतृत्व म्हणजे बाळासाहेब थोरात. त्यांच्या नेतृत्वावरच जनतेचा विश्वास कायम आहे.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

# संगमनेरात ९०० किलो गोमांस जप्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहर पोलिसांनी शनिवारी (दि. १) मध्यरात्रीनंतर केलेल्या कारवाईत बेकायदेशीररीत्या वाहतूक केली जात असल्याचा संशय असलेले तब्बल ९०० किलो गोमांस जप्त केले. या कारवाईत ४ लाख रुपये किमतीची अलिशान कार आणि २ लाख ७० हजार रुपये किमतीचे मांस असा एकूण ६ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. मात्र, पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचताच संशयित आरोपी अंधाराचा फायदा घेत पसार झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी मध्यरात्रीनंतर सुमारे २ वाजण्याच्या सुमारास जमजम कॉलनी परिसरात (देहा) रस्त्याच्या कडेला एमएच १२ केए ४७९५ क्रमांकाची एक संशयास्पद अलिशान कार उभी असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहनाची तपासणी केली असता, कारमध्ये मोठ्या प्रमाणात गोमांस आढळून आले.


दरम्यान, वाहनाजवळ उभा असलेला अज्ञात व्यक्ती पोलिसांची चाहूल लागताच अंधाराचा फायदा घेऊन घटनास्थळावरून फरार झाला. पोलिसांनी वाहन ताब्यात घेऊन त्यातील सुमारे ९०० किलो गोमांस जप्त केले.

याप्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात पोलीस शिपाई ऋतिक अरविंद बेनके (सोटार परिवहन विभाग) यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपीविरोधात संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल सुजाता थोरात करत आहेत.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

दर्शन टेक्सटाईल मार्केट
आकर्षक लुक्ससाठी ट्रेंडी
लेडीज़ सूट्स
सेले नव्हे होलसेल सेल 30% ते 70%

संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य

जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
- सर्जरी विभाग - डायलिसीस विभाग - हृदयरोग विभाग - जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग - सुपर स्पेशालिटी विभाग - मेडिसीन विभाग - स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग - न्यूरोविभाग - अद्ययावत कॅथलॅब - मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25